# नियमित दिवाणी दावा क्र. २१५/२००४ मधील नि.क्र.१७६ वरील आदेश.

१. अर्ज व त्यावरील प्रतिपक्षाचे म्हणणे यांचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

२. या पार्श्वभूमीवर एकच वादप्रश्न निश्चितीकरणासाठी उपस्थित होतो. तो असा की, ''मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करता येईल का ?'' यावरील माझा निष्कर्ष मी खालील नमूद कारणांमुळे ''होकारार्थी'' नोंदविला आहे.

## कारणमिमांसा

३. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.३ ने केलेले अभिवेदन असे की, नि.क्र.४९ वर रामदास गोविंद गाडेकर यांची साक्ष झाली होती. सदर साक्षीदार त्याला धमकावल्यामुळे आता स्वत:हून साक्षीस येण्यास तयार नाही. त्यामुळे त्याला साक्षी समन्स काढण्यात यावे.

४. वादीच्या म्हणण्याद्वारे त्याने अर्जातील सर्व अभिकथने नाकारली आहेत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे खोटया मजकूराचा अर्ज देण्यात आलेला आहे. त्यामुळे तो रद्द व्हावा.

५. प्रतिवादी क्र.३ त्यांच्या विधीज्ञांनी केलेल्या युक्तीवादाप्रमाणे इतर प्रतिवादींच्या उलटतपासासाठी सदर साक्षीदारास उपस्थित ठेऊ इच्छीतात. सदरसाक्षीदारास साक्षी समन्स काढल्यामुळे कुणाचेही नुकसान होणार नाही. सबब पुढील आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नियमाप्रमाणे साक्षी भत्ता तीन दिवसांत भरल्यानंतर साक्षीदारास त्वरीत समन्स काढावे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

(खुल्या न्यायालयात निवेदित आणि जाहीर)

स्वाक्षरीत/-
(वर्षा बा. पारगांवकर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

दिनांक : २१/०७/२०१६.